Cosmos Multidisciplinary Research E-Journal
Online Available at www.cmrj.in
Recognized International Peer Reviewed Journal
Impact Factor 4.94
ISSN No. 2456-1665

# १९९० नंतरची कादंबरीः संकल्पना आणि स्वरूप

**सुमित्रा साहेबराव भुमरे**
एम.ए. मराठी

कादंबरी  हा वाङ्मयीन सृजनशील आणि व्यापक अविष्कार आहे. कादंबरीच्या संकल्पनेचा, स्वरूपाचा विचार सूक्ष्मपणे करता, तिचा आकार, घाट, रचना, वाचक-लेखक यांची कादंबरी विषयीची कल्पना, तिने काय द्यावे, तिच्यात काय मूलद्रव्य असावे, ते कसे असावे, तिचा उ-ेश काय अशा नानाविविध बाबींचा समावेश असतो. या सर्वांगाने खुलेपणा, मोकळेपणा असूनही कादंबरीचा घाट तयार होतोय, काही वेळा हा घाट तयार होत नाही. यामागील कारण अस्थिर स्थलकाल, त्यातील नित्यनवीन माणसे, बदलते प्रश्न आणि काळाचा परिवर्तनशीलपणा इतयादी बाबींचा प्रतिध्वनी उमटत असल्यामुळे कादंबरी वाङ्मय प्रकाराची संकल्पना प्रवाही स्वरूपाची असते. याचा प्रत्यय त्याच्या कालखंडातील कांदबरीच्या स्वरूपाचे निरिक्षण केलयास येतो. उदा. मराठीतील पहिली कादंबरी जी बाबा पद्मजी यांची ‘यमुना पर्यटन‘ तीचे स्वरूप संकल्पना व आजच्या कालखंडातील भालचंद्र नेमाडे यांची ‘हिंदू जगण्याची अडगळ‘ या कादंबरीचे वाङ्मयीन स्वरूप, संकल्पना पाहिल्यास कादंबरी वाङ्मयाचे स्वरूप व संकल्पना स्थलकाल प्रवाही असते हेच स्पष्ट आहे.

कादंबरी या वाङ्मय प्रकाराचे स्वरूप, संकल्पना ही स्थलकाळ प्रवाही असल्यामुळे या वाङ्मय प्रकाराची संकल्पना गुंतागुंतीची, व्यामिश्र आणि लेखक-वाचक सापेक्ष असते. त्या-त्या काळातील समानशीती यावर कादंबरीचे स्वरूप, संकल्पना निर्धारित असते. यावरून कादंबरीचे स्वरूप-संकल्पना यातील खोली, व्याप्ती  आणि गुंतागुंत लक्षात येते.

मराठी साहित्य विश्वामध्ये कादंबरीची स्वरूप-संकल्पना या अंगानी अलिकडील काळात अभ्यासकांनी खुप विचार मंथन मांडलेले आहे. यामध्ये कुसुमावती देशपांडे, भालचंद्र नेमाडे, रंगनाथ पठारे, वि.का.राजवाडे, वा.म.जोशी इत्यादींनी विस्तृतपणे विवेचन करण्याचा प्रयत्न केलेला आहे. तर नरहर कुरूंदकर यांनी ‘धार आणि काठ‘ या पुस्तकात या अनुषंगाने अल्पसा प्रयत्न केलेला आहे. पण तो अधिक स्पष्ट नसून अस्पष्ट स्वरूपात आहे. पण रा.ज. देशमुख यांना लिहिलेल्या पत्रात त्यांनी व्यापक आणि मार्मिक चर्चा केलेली आहे. यावरून मराठी वाङ्मयामध्ये कादंबरीची संकल्पना या विषयास प्राप्त झालेले महत्त्व अधोरेखित होते.

१९९० नंतरच्या मराठी कादंबरीच्या स्वरूप संकल्पनेचा विार करण्यापुर्वी कादंबरीच्या संकल्पनेबाबत अभ्यासकांनी नोंदविलेली मते पाहिल्यास कादंबरी वाङ्मयाची संकल्पना, स्वरूप, गुंतागुंत, सूक्ष्मता व्याप्ती अधिक स्पष्ट होण्यास मदत होईल.

वि.का.राजवाडे यांनी 'कादंबरी' या निबंधामध्ये कादंबरीचे स्वरूप-संकल्पना याबाबत विस्तृत विवेचन केलेले आहे. विस्तार भयास्तव त्यांच्या विवेचनाचा सार नोंदवितो. ते म्हणतात, ''वास्तववादी वाद असे काही नसते ही गोष्ट सुटी-सुटी तर नसतेच उलट वास्तववाद आणि अद्‌भुतवाद याचे मिश्रण असते.''[१] इतिहासाचार्य राजवाडे यांनी मांडलेला कादंबरी स्वरूप-संकल्पनेचा विचार सूक्ष्म नसून वरवरचा आहे. स्थलकालानुसार कादंबरीची संकल्पना परावर्तित होत असते. श्री. राजवाडे यांनी कादंबरीच्या संकल्पनेचा केलेला विचार अद्‌भुतरम्य कादंबरीच्या कालखंडात मांडलेला आहे. याही त्यांच्या लेखनाच्या मर्यादा विचारात घ्याव्या लागतील.

श्रीधर व्यंकटेश केतकर यांच्या गोंडवनातील प्रियवंदा (१९२६), परागंदा (१९२६) आशावादी (१९२७), ब्राह्मणकन्या (१९३०), गावसासू (१९३०) या कादंबऱ्या वास्तववादी, सरस, रचनेची प्रमाणबद्धता इत्यादी वैशिष्ट्यांनी संपन्न आहे. या कादंबरीच्या अनुषंगाने कादंबरीची संकल्पना, स्वरूप नोंदविताना वा.म. जोशी म्हणतात, ''कलात्मकतेच्या नावावर विचारशून्यता लपवण्यापेक्षा कलात्मकतेकडे थोडेसे दुर्लक्ष करून संसारातील विविध दृश्ये जी सामान्य लोकांच्या गरजेला आली नसती ती दाखवणे, त्यातील खोल मर्म सुचविणे, त्यांच्या दर्शनाने सुविचारांत व सद्‌भावनेत आणि सात्विक आनंदात भर घालणे हे अधिक श्रेयस्कर आहे.''[२] वा.म. जोशी यांनी श्री.व्य.केतकर यांच्या कादंबरीवरून नोंदविलेले संकल्पनेबाबतचे निरिक्षण कलात्मकतेसह वास्तववाद आणि मानवी जीवनवाद निर्देशित केला आहे. केवळ कलावादात अडकलेल्या कादंबरी संकल्पनेला वास्तववाद आणि कलावादाच्या संमिश्र मिश्रणातून मांडण्याचा निर्देश करतात, हा विचारही तत्कालीन काळातील कादंबरी लेखनाचाच परिप्रेक्ष असून कलात्मकतेला वास्तववादाचा संदी प्राप्त करून कादंबरी वाङ्‌मयाची संकल्पना मांडणारा आहे. यावरून कादंबरीची संकल्पना कालस्थळ याचे आपत्य असल्याचेचं सिद्ध होते.

कादंबरी वाङ्‌मयाची संकल्पना सर्वाधिक शास्त्रशुद्ध मांडण्याचा प्रयत्न भालचंद्र नेमाडे यांनी केलला आहे. या विचारातून ही संकल्पना अधिक स्पष्ट होते. त्यांच्याच विचाराला प्रमाण मानुन नवोत्तर कादंबरीच्या संकल्पनेचा विचार करावयाचा आहे. ते विचार पुढीलप्रमाणे, 'समाजजीवनाच्या नोंदी करणारा वाङ्‌मयप्रकार म्हणून जन्माला आलेल्या कादंबरीत सामाजिक वास्त हे द्रव्य असते. सामाजिक वास्तव व व्यक्तिनिष्ठ वास्तव असे वास्तवाचे विभाजन होऊ शकत नाही. व्यक्ती आणि समाज यांच्यातले हे विभाजन सर्जन प्रक्रियेला परवडणारे नाही. समाजाला आधारभूत अशा प्रेरणांवरच आजच्या सर्व सौंदर्यकृती निर्माण होतात. सौंदर्याचे निकषही प्राय: समूहनिष्ठ असतात. संपूर्ण मानवी व्यक्तिमत्त्व मांडणे म्हणजेच माणूस व समाज यांमध्ये असलेले एकजिनसी संबंध मांडणे होय.''[३]

भालचंद्र नेमाडे, वा.म.जोशी यांचे कादंबरीच्या संकल्पनेबाबतचे विचार ही संकल्पना स्थिर नसून काळ, स्थळ, वेळ आणि समाज यानुसार सतत परिवर्तनशील असते. असाच नवा विचार मांडणारे आहेत.

**१. १९९० नंतरच्या कादंबरी संकल्पना व स्वरूप : एक आढावा :**

१९९० नंतर मराठी भाषेमध्ये निर्माण होणाऱ्या सर्व वाङ्मय प्रवाहामध्ये स्थित्यांतरे झाली. याच कालखंडामध्ये भांडवलशाही शासन व्यवस्था आणि समाज व्यवस्थेतील बदलासह मानवाचा संकूचित स्वकेंद्रीपणा या पार्श्वभूमीवर नव्याने अवतरणारी मराठी कादंबरी या कादंबरीचे स्वरूप व संकल्पना याबाबतचे विवेचन विस्ताराने मांडू.

**१. कादंबरीची संकल्पना अस्थिर असते :**

'कादंबरी' हा वाङ्मय प्रकार जीवनानुभूती मांडणारा व्यापक साहित्य प्रकार आहे. या वाङ्मय प्रकाराची संकल्पना अस्थिर असते. १९९० नंतरच्या कादंबरीच्या संकल्पनावर ओझरती नजर टाकल्यास सहज स्पष्अ होते. भालचंद्र नेमाडे यांनी लिहिलेल्या 'कोसला' कादंबरीचे उदाहरण घेतल्यास ही बाब अधिक स्पष्ट होते. कोसला कादंबरीच्या संकल्पनेचा-स्वरूपाचा विचार करण्यापुर्वी एक बाब नोंदविणे महत्वाचे आहे. ही कादंबरी तत्कालीन काळातील कादंबरीचे संकेत मांडणारी एक महत्वाची कादंबरी आहे. स्वकेंद्री नायकावर आधारलेली कलाकृती तत्कालीन काळात वाचकांनी स्वीकारणे हीच गोष्ट दुरापास्त होती. अशा परिस्थितीत या कादंबरीने वाचकाच्या मनाची जागा घेतली. त्याचबरोबर या कादंबरीने कादंबरी वाङ्मयाची नवी संकल्पना-स्वरूप रूळ केली. यावरून कादंबरीची संकल्पना अस्थिर असल्याचे स्पष्ट होते. पुर्वाश्रमीच्या कादंबरी संकल्पनेबरोबर कोसलाला नव्या संकल्पनेचाही समीक्षक, वाचक यांनी स्वीकार केला.

१९९०नंतरच्या कालखंडामध्ये स्थिर, सरळमार्गी, नम्र आणि समाजशील तरूणाची प्रतिमा कोसला कादंबरीने पुर्णत: नाकारून स्वकेंद्री विस्कटलेली मनस्थिती नम्रतेची जागा उद्धटपणाने घेतलेली असा नायक या समाजजीवनाच्या गाभातून उदयास येतो. समाज मनातील अस्वस्थतेचा विदाकर अनुभव मांडत वाचकाचा आधार घेतो. काल्पनिक, वास्तववाद यापुढे जाऊन ही कादंबरी अतीवास्तववाद स्वीकारते ही या कादंबरीची स्वरूपात्मक संकल्पना आहे.

**२. एकाच काळात विविध कादंबरी संकल्पना कार्यरत असतात.**

१९९० च्या दरम्यान आनंद यादव, राजन गवस, शेशराव मोहिते, विलास सारंग, श्याम मनोहर, अनिल दामले, भारत काळे, दिलीप चित्रे, इत्यादी लेखकांनी कादंबरी लेखन केलेले आहे. पण एकाच काळात लेखन करूनही कादंबरीची प्रवृत्ती, स्वरूप आणि संकल्पना भिन्न-भिन्न स्वरूपाची आहे. आनंद यादव यांची झोंबी, ही कादंबरी चरित्रात्मक कादंबरीचे स्वरूप प्राप्त करणारी आहे. या कादंबरीतील नायक आनंदा सामान्य गरीब कुटुंबातील असून नम्र, शिस्तप्रियही आहे. शिक्षणाच्या प्रती त्याच्या मनात अपार श्रद्धा असल्यामुळे तो घरादाराचा, आपल्या भावाचा, मानसाचा त्याग करतो आणि शिक्षणाच्या ध्यासाने घरदार सोडतो. तर या उलट याच काळात

भालचंद्र नेमाडे 'कोसला' ही कादंबरी लिहितात. या कादंबरीला कादंबरी मानायची का हा प्रश्न उपस्थित करून ही लहान मुलाची गोंधळलेल्या मनस्थितीचे निरिक्षणेही नोंदविली. तर याच काळात रणजित देसाई 'स्वामी' सारखी ऐतिहासिक कादंबरी तकतिने मांडतात.

१९९० च्या कादंबरीचे वरूप आणि संकल्पना चार प्रवृत्तीमध्ये विभागलेली पहावयास मिळते. एकाच कालखंडात चार संकल्पनात्मक प्रवृत्ती पहावयास मिळतात. असा अभिप्राय रंगनाथ पठारे यांनी नोंदविलेला आहे. ते म्हणतात, ''आजच्या मराठी कादंबरीचा विचार करायचा ठरला तरी त्यात चार ठळक प्रकृती दिसतात. त्यांना काही नावे देण्यापेक्षा काही कादंबरीकारांच्या उदाहरणादाखल निर्देश करून प्रवृत्तीकडे संकेत करता येईल उदाहरणार्थ, विलास सारंग, श्याम मनोहर, अनिल दामले ही एक प्रवृत्ती. राजन गवस, शेषराव मोहिते, भारत काळे, ही दुसरी प्रवृत्ती आनंद यादव प्रणीत कादंबरी ही तिसरी तर राजन खान, अरविंद रे ही चौथी प्रवृत्ती.''[४]

पहिल्या स्वरूपाच्या संकल्पनात्मक कादंबरीमध्ये समकालीन सामाजिक प्रश्नांविषयी काहीशी दुरावस्था, सांस्कृतिक प्रश्नाबाबत संशयास्पद वृत्ती तर आध्यात्मिक प्रश्न, वैश्वीक जाणीवा याबाबत मात्र आस्था असणारा मोठा वर्ग पहावयास मिळतो. या वर्गातील कादंबरीला मोठा समीक्ष वर्ग लाभला. परंतु दुर्दैवाने मोठा वाचक वर्ग लाभला नाही. शब्द सामर्थ्य मोठे असूनही आशयाच्या पातळीवर कणभरता त्यात आहे.

दुसऱ्या प्रकारच्या प्रवृत्तीमधील कादंबरीमध्ये समकालीन प्रश्नांचे भान व त्यांच्याविषयीची गाढ आस्था या स्वरूपाच्या कादंबरीच्या मूळाशी पहावयास दिसते. या कालखंडातील किंवा प्रवृत्तीतील कादंबरीतील प्रश्न सामाजिक व सांस्कृतिक स्वरूपाचे आहेत. अनुभवाचे संचित ठासून भरलेले असते पण या प्रवृत्तीतील लेखक काही ग्रामीण आडदांड पणाने लिहित असतात. या स्वरूपाच्या कादंबरी संकल्पनेचे महत्वाचे वैशिष्ट्य म्हणजे खेडे विरूद्ध शहर या स्वरूपाच्या ठोकळेबाज स्वरूपात पाहत असतात. शहरात गेलेला खेड्यातील वर्ग तिथे हलाखीत राहत असतो तरीही त्यांचा मनाचा गुंता खेड्यात आढळलेला असतो. या मागील महत्वाचे कारण म्हणजे त्यांची नाळ शेतीशी कृषी जाणिवेशी एकरूप झालेली असते.

तिसऱ्या स्वरूपाच्या प्रवृत्तीमध्ये आनंद यादव अलिकडील नवनाथ गोरे यासारख्या लेखकांच्या लेखनाचा समावेश होतो. या प्रवृत्तीच्या लेखनाचे वैशिष्ट्ये म्हणजे व्यक्तिवादी स्वरूपाचे कादंबरी लेखन होय. समाज जीवनाविषयी त्यांच्या मनात संशयास्पद असल्याची शंका यावी इतके त्यांचे लेखन वैयक्तिक स्वरूपाचे असते. आपल्या अडचणी, आपले दु:ख भोगलेला त्रास हे त्यांच्या लेखनाचे भांडवल असते. कोणत्याही स्थितीत आपली प्रगती हाच त्यांच्या जीवनाचा स्पष्ट हेतू असतो. ग्रामीण कादंबरीत या स्वरूपाचे लेखन अधिक पहावयास मिळते. याची पुढील पायरी म्हणजे विश्वास पाटील यांची लेखन प्रवृत्ती होय. याचे प्रत्यंतर त्यांच्या कादंबरीतून येत असते. त्यांना जाणवलेल्या प्रश्नांना साहित्यकृतीच्या माध्यमातून सफाईदारपणे मांडण्यात त्यांचा हातखंडा असतो. हे या

प्रवृत्तीच्या कादंबरी संकल्पनेचे-स्वरूपाचे महत्वाचे वैशिष्ट्य असते. या प्रवृत्तीतून मराठी कादंबरीचे लेखन राजन खान, अरविंद रे या कादंबरीकारांनी केलेले आहे.

**कादंबरी संकल्पना आणि समाजस्थिती यांचा निकट संबंध असतो.**

१९९० नंतरच्या कादंबरीमध्ये औद्योगिकरण आणि जागतीकीकरण यामुळे निर्माण झालेलया प्रश्नाचे प्रतिबिंब अधिक जाणवते. तरूणांच्या मनातील स्वच्छंदी प्रश्न आणि त्यातून निर्माण झालेली अस्वस्थता हे या कालखंडातील कादंबरीच्या स्वरूप-संकल्पनेचे महत्वाचे विशेष आहे. आनंद यादव यांच्या सर्वच कादंबरीतून मग ती झोंबी, नांगरणी अगर घरभिंती असुदे त्यातून संषर्घ करणारा ग्रामीण तरून आणि ग्रामसंस्कृतीचा औद्योगिकरणामुळे होत चाललेला ऱ्हास याचे प्रभावी वर्णन आलेले आहे. या साहित्यातील अनुभव सामाजिक स्थितीने वास्तववादी वर्णन करणारे आहे.

नवनाथ गोरे यांची 'फेसाटी' याही कादंबरीचे उदाहरण पाहिलयास शिक्षीत तरूण जीवनातील अस्थिरता नाहीशी करण्यासाठी प्राणांतिक धडपडतो आहे. पण जागतिकीकरण, औद्योगिकरण आणि राजकीय उदासिनतेचा बळी ठरतो. संपूर्ण कादंबरीत आयुष्यातील पुर्व होरपळ पोटतीडकीने मांडतो. त्या दु:खाला समाजव्यवस्थेचेही संदर्भ प्राप्त झालेले आहेत. या सर्वाचा विचार केल्यानंतर कोणत्याही कालखंडातील कादंबरीच्या संकल्पनेला अथवा स्वरूपाला समााजिक स्थितीचे संदर्भ प्राप्त झालेले असतात.

साहित्यकृतीची निर्मिती सामाजिक अनुभवाच्या परिघातून होत असतो. त्याचप्रमाणे साहित्यकृतीचा वाचक सुद्धा त्या परिघातच भावविश्व व्यथित करत असतो. लेखन हे काळाचे अपत्य असते. त्याचप्रमाणे वाचकाचीही अभिरूची, रसिकता आणि स्वानुभवाला निर्वात पोकळीत शोधण्याची ओढ असते. म्हणजे साहित्यकृतीची निर्मिती आणि वाचकांची अभिरूची, रसिकताहे कार्य समाजशिल असतात.

**सारांश :**

कादंबरी वाङ्मय प्रकाराची स्वत:ची वाङ्मयीन म्हणून संकल्पना आणि स्वरूप असते. ते बाह्य घटकांनी निर्धारित केलेले असते. यामुळेच हा वाङ्मय प्रकार अन्य वाङ्मयीन प्रकारापेक्षा वेगळा वाटतो अथवा असतो. तरीही कादंबरीच्या कालस्थितीतील स्वरूपाचा अगदी सूक्ष्म विचार केल्यास कादंबरीचे अंतर्गत स्वरूप आणि संकल्पना कालपरत्वे बदलताना दिसते. काळानुरूप कादंबरीचे स्वरूप-संकल्पना बदललेली आहेच. पण एकाच कालखंडात विविध संकल्पनेतून कादंबरीचा आविष्कार झालेला आहे.

साहित्य कृतीचा निर्माता आणि वाचक समाजाचे घटक असतात. त्यांच्या जीवनाची, अनुभवाची जडणघडण समाजात होत असते. समाजजीवनातील स्थितीचा व्यापक परिणाम साहित्य कृतीवर होत असतो. याला कादंबरी

वाङ्मय प्रकारही अपवाद नाही. कादंबरीचे स्वरूप व संकल्पना परिवर्तनीय असून त्यावर समाजस्थितीचा परिणाम होतो.

**निष्कर्ष :**

कादंबरी वाङ्मयाची संकल्पना आणि स्वरूप हा विस्तृत अभ्यास विषय असून त्यांच्या चर्चेच्या मांडणीची व्याप्तीही मोठी आहे. शोधनिबंधाच्या मर्यादा लक्षात घेऊन मर्यादित मांडणी करण्याचा प्रयत्न केलेला आहे. अभ्यासांती प्राप्त झालेले निष्कर्ष पुढील प्रमाणे आहेत.

१. कादंबरी वाङ्मय प्रकाराची संकल्पना अस्थिर असते. कालखंडानुसार तिच्या स्वरूपामध्ये परिवर्तन होत असते. सामाजिक स्थितीचा कादंबरीच्या संकल्पना परिवर्तनावर परिणाम होत असते.

२. कादंबरीची संकल्पना-स्वरूप गुंतागुंतीची असते. लेखक कादंबरीची संकल्पना मांडत नाही पण, कादंबरीच्या रचनेतून कादंबरीचा संकल्पना ध्वनीत होत असते. याचा प्रत्यय १९९० नंतरच्या कादंबरीवरून येतो.

३. कादंबरीचे आशयद्रव्य जीवनातून वा समाजातून प्राप्त होत असते. पण समीक्षा साहितय कृतीला जीवनाशी जोडत असते. यावरून कादंबरीची संकल्पना स्पष्ट होत असते.

**संदर्भटीपा :**

१. राजवाडे, वि.का. : राजवाडे लेखनसंग्रह भाग-२, म.स.संस्कृती मंडळ, मुंबई १९४०

२. जोशी वा.म. मराठी कादंबरी, राजहंस प्रकाशन, पुणे प्रथमावृत्ती १९६० पृष्ठ क्रमांक ७०

३. पठारे, रंगनाथ : आजची कादंबरी : नोंदी आणि निरिक्षणे, शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर २०१४ पृष्ठ क्रमांक ३९

४. कित्ता : पृष्ठ क्रमांक ५३.